# अटी व शर्ती

१. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पुनरुज्जिवित माहितीपटांचे मालकी हक्क माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे आहेत.

२. हे माहितीपट सामान्य जनतेच्या माहितीकरीता व अभ्यासाकरीता आहेत.

३. वेबसाईटवर प्रत्येक माहितीपटाचा १ मिनिटांचा ट्रेलर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तो पाहून संबंधित व्यक्तीने स्वतःबाबतची संपूर्ण माहिती भरुन पेमेंट गेटवेद्वारे शुल्क अदा करावे.

४. शुल्क प्राप्त झाल्यानंतर २ दिवसांकरीता संबंधित माहितीपट डाऊनलोड करण्यासाठी लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. तांत्रिक कारणास्तव २ दिवसात माहितीपट डाऊनलोड न झाल्यास संबंधितांनी ०२२-२२८३५१७३ या दूरध्वनी क्रमांकावर वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र) यांच्याशी संपर्क साधावा.

५. पेमेंट गेटवेद्वारे शुल्क भरणा करताना मूळ रक्कम+हाताळणी शुल्क या प्रकारे संबंधितांना शुल्क अदा करावे लागेल. (हाताळणी शुल्क हे माहिती तंत्रज्ञान संचालनालायाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, शुल्क भरणा करण्याच्या पद्धतीनुसार तसेच बँकेच्या निवडीनुसार वेगवेगळे असेल.) ऑनलाईन शुल्क भरण्यापूर्वी Receipt या ठिकाणी पेमेंट गेटवे मधील बँकांची नावे व हाताळणी शुल्काची रक्कम कळू शकेल.

६. कोणत्याही कारणास्तव ई पेमेंट द्वारे भरलेले शुल्क संबंधितांना परत केले जाणार नाही.

७. ई पेमेंट केल्यानंतर प्राप्त होणारी पावती संबंधितांनी जपून ठेवणे आवश्यक आहे.

८. महासंचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीपटांचा अथवा त्यातील काही भागांचा व्यावसायिक कारणास्तव उपयोग करावयाचा असल्यास त्यांचे दर वेगळ्या प्रकारचे असून संबंधितांनी ०२२-२२८३५१७३ या दूरध्वनी क्रमांकावर वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र) यांच्याशी संपर्क साधावा.

९. या सर्व प्रक्रीयेबाबत कोणतीही अडचण उद्‌भवल्यास srasstdir1.dgipr@maharashtra.gov.in या ई मेल पत्त्यावर अथवा ०२२-२२८३५१७३ या दूरध्वनी क्रमांकावर वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र) यांच्याशी संपर्क साधावा.

१०. कोणताही माहितीपट सशुल्क उपलब्ध करुन देण्याचा अथवा न देण्याचा अधिकार महासंचालनालयाने राखीव ठेवला आहे.